The South Asian Academic Research Chronicle ISSN 2454-1109
A Refereed Interdisciplinary Indexed International Open Access Monthly e-Journal
Vol 11.Issue1 & 2; Jan-Feb 2024

# वारकरी साहित्य चळवळ आणि सामाजिक बदल

**प्रा.डॉ.कांबळे डी.आर.**
मराठी विभाग, लोकमान्य महाविद्‌यालय, सोनखेड

**प्रस्तावना :**

महाराष्ट्राचा जो ज्ञात राजकीय इतिहास आहे तो असा इ.स. सनाच्या प्रारंभापासून ते १४ व्या शतकापर्यंत अनुक्रमे सातवाहन, वाकाटाक, पूर्व चालुक्य, राष्ट्रकूट, उत्तर चालुक्य व यादव या घराण्यांची सत्ता ही मध्यवर्ती महाराष्ट्रावर व विदर्भावर होती. यापैकी मराठी म्हणता येईल असे फक्त यादव राजेच होते. यादवांच्या राजकीय कारकीर्दीचा काळ इ.स. १२७१ ते इ.स.१३१८ असा स्थूल मानाने सांगता येतो. यादवकाळातच महाराष्ट्रात वैदिक, बौध्द आणि जैन धर्म नांदत होते. हा काळ धार्मिक, सांप्रदायिक, भाषिक संघर्षाचा काळ होता. मूळचे बौध्द आणि जैन धर्म नामशेष होण्याच्या मार्गावर होते तर वैदिक धर्माचे प्राबल्य वाढत होते. यादवकालीन समाजमन धर्मसंस्काराने एकप्रकारे बधीर झाले होते. या काळात देवतांची संख्या अगणिक वाढली होती. हेमाद्री पंडित हा महान धर्मशास्त्रकार म्हणून ओळखला जात होता. राजकारण, समाजकारण व धर्माची सर्व सूत्रे हेमाद्री पंडिताच्या बुद्धीनेच हालत होती. धार्मिक जीवनाचे नियमन, नियंत्रण हे हेमाद्री पंडिताच्या 'चतुर्वर्गचिंतामणि या ग्रंथानुसार होत होते. "यादवराज्यातील ब्राह्मणवर्गात कर्मकांडाचे आणि व्रतवैकल्यांचे बरेच बंड माजले होते.

हेमाद्रीने आणि ज्ञानदेवाने परंपेरेचे सातत्य टिकविण्याकरीता जुन्या वैदिक धर्माचे पुनरुज्जीवन करण्याचा आटोकाट प्रयत्न केला त्यांना शास्त्राची चाकोरी सोडता येत नव्हती."१ म्हणून यादवकालीन महाराष्ट्रातील धार्मिक, सामाजिक परिस्थिती म्हणजे धर्म संघर्ष, मतामतांचा गलबला असून मानसिक गुलाम झालेल्या, धर्मसंस्कारांची बाधा झालेल्या समाजाची एक प्रकारची स्थितीप्रियता होय. कारण धर्माचा अर्थ वैदिक धर्माभिमानी आपापल्या सोयीनुसार सांगू लागले. धर्म हा विशिष्ट वर्गापुरताच बंदिस्त केला गेला. त्यामुळे समाजातील बहुसंख्य लोकांची धार्मिक आणि सामाजिक बाबतीत कुचंबणा होत होती. ही कुचंबणा पाहून तत्कालीन संतमंडळी मनोमन कळवळली, तळमळली आणि या तळमळीतूनच महाराष्ट्रात अनेक पंथाची निर्मिती झाली. जैन, शैव, वैष्णव, नाथ, दत्त, वारकरी व महानुभाव इ. पंथ निर्माण झाले. या पंथाचे साहित्य निर्माण झाले. या साहित्याने चळवळीचे रूप धारण केले. काही काळाच्या ओघात लोप पावले तर काहींनी मानवी जीवनाची विस्कटलेली घडी बसविली. त्यामुळे ते लोकप्रिय झाले. वारकरी साहित्य चळ- वळही त्यापैकीच एक आहे. या साहित्य चळवळीने तत्कालीन समाजजीवनाची विस्कटलेली घड़ी बसवून अध्यात्मातून समाज प्रबोधन केले. धर्माधिष्ठित परंपरागत समाजात त्यांनी परिवर्तन केले. तेंव्हा या वारकरी साहित्य चळवळीमुळे कोणता सामाजिक बदल झाला त्याचे स्वरूप येथे जाणून घ्यायचे आहे.

भारतातील अनेक भक्ती साहित्य चळवळीपैकी महाराष्ट्रातील वारकरी साहित्याची चळवळ एक प्रमुख भक्ती साहित्य चळवळ आहे. ही साहित्य चळवळ संप्रदाय, पंथ या नावानेही ओळखली जाते. या साहित्य चळवळीने मराठी मनाच्या व मराठी साहित्याच्या जडणघडणीत महत्त्वाचे योगदान दिले आहे. पंढरपूरचे श्रीविठ्ठल दैवत व या विठ्ठलाची वारी हे या साहित्य चळवळीचे प्रमुख अधिष्ठान आहे. उपास्य दैवत आहे. या साहित्य चळवळीची व्याप्ती मराठी प्रदेशापुरती मर्यादित असली तरी तिच्या अधिष्ठानी

श्रीविठ्ठल देवतेचे स्वरूप विशाल आहे. या साहित्य चळवळीच्या अनुयायांमध्ये ज्ञानदेव, नामदेव, एकनाथ, तुकाराम आणि सावता माळी, गोरा कुंभार, चोखा मेळा, सेना न्हावी असे कितीतरी दिगंत कीर्तीचे संत आहेत. त्याच बरोबर संत जनाबाई, संत बहिणाबाई, संत कान्होपात्रा अशा काही संत कवयित्री ही आहेत. यांनी निर्मिलेले वाङ्मय हे जगातील वाङ्मयात भूषणावह ठरलले आहे. बाराव्या-तेराव्या शतकात महाराष्ट्रात उगम पावलेली वारकरी साहित्य चळवळ आहे. या साहित्य चळवळीने अध्यात्मातून समाज प्रबोधन करण्याचे महत्त्वाचे कार्य केले आहे. या चळवळीची साहित्यरूपी वाङ्मयीन जीवनगंगा शतकानुशतके जिवंतपणे वाहत आहे. महाराष्ट्रातील खेड्या-पाड्यातून सर्वसामान्य जनतेपर्यंत आज ती पाहोचलेली आहे. म्हणून मराठी साहित्याच्या वाङ्मयीन परंपरेत वारकरी साहित्य चळवळीला विशेष महत्त्व आहे.

वारकरी साहित्य चळवळ ही यादवकाळात सुरू झालेली जशी साहित्य चळवळ आहे तशीच ती एक धार्मिक व सामाजिक चळवळही आहे. तिचे परिणाम साहित्य व समाजजीवन या दोन्हीवरही झालेले आहेत. ही चळवळ भारतीय परिवर्तन व समाज प्रबोधन या दोन्हीशी निगडीत आहे. कारण बाराव्या-तेराव्या शतकातील यादवकाळातील अध्यात्मिक सांस्कृतिक संस्कृतीचे दर्शन वारकरी साहित्य चळवळीतूनच होते. त्या काळातील व्यक्तीजीवनात व समाज जीवनात जो परंपरागत विचारधर्म, आचारधर्म आणि व्यवहार धर्म प्रचलित होता. त्याचे स्वरूप काय होते? हे वारकरी साहित्य चळवळीच्या माध्यमातून आपल्या लक्षात येते. महाराष्ट्रात धार्मिक व सामाजिक प्रबोधनाची मुहूर्तमेढ खऱ्या अर्थाने रोवली ती वारकरी साहित्य चळवळीने, वारकरी साहित्य चळवळीने धर्मसुधारणेचे व लोकजागृतीचे कार्य केले आहे. "देशकालपरत्वे व्यक्तीचे आणि समाजाचे नियमन करण्यासाठी धर्मशास्त्राचा आधार ज्ञानदेवांनी घेतला आणि वेदोक्त धर्माला कालसापेक्ष स्वरूप देण्यासाठी प्रस्थानत्रयी पैकी असलेली भगवद्गीता निरूपणासाठी ज्ञानदेवांनी स्वीकारली."२ ज्ञानदेवांच्या विचारसरणीचा आदर्श पुढे ठेवून संत नामदेवापासून ते संत एकनाथ, तुकाराम, चोखामेळा या सर्वच संतानी आपल्या श्रेष्ठ साहित्य तत्वांच्या आधारे समाजाला स्फूर्ती देण्याचे कार्य केले.

ज्ञानदेवांनी 'ज्ञानेश्वरी', अमृतानुभव यासारखे ग्रंथ निर्माण करून वारकरी साहित्य चळवळीला वैचारिक अधिष्ठान प्राप्त करून दिले. "जनसामान्याच्या भाषेत प्रभावीपणे धर्मतत्व मांडण्याचे सामाजिक कार्य विसोबा खेचर, चोखामेळा, निवृत्तीनाथ, सोपानदेव, बंका महार, ज्ञानेश्वरांनी 'ज्ञानेश्वरी' या ग्रंथाद्वारे केले."३ म्हणून यादव काळातील वारकरी साहित्य चळवळीच्या वाङ्मय निर्मितीची प्रेरणा मुख्यतः ही धार्मिक स्वरूपाची आहे. परंतु धर्म हाच तत्कालीन कालखंडातील समाजाचा केंद्रबिंदू होता. म्हणून कला साहित्य आणि तत्वज्ञानाच्या माध्यमातून धार्मिक विचार मांडला जात होता. परंतु हा धर्म विचार संस्कृत भाषेत बंदिस्त होता. संस्कृत मधील धर्म विचार सर्वसामान्यांच्या मराठी भाषेत आणला पाहिजे, ही प्रेरणा यातून निर्माण झाली व ती वारकरी साहित्य चळवळीच्या वाङ्मयीन निर्मितीस कारण ठरली. तेंव्हा बारावं-तेरावं शतक हे एका अर्थाने मराठी साहित्याचा व वारकरी साहित्य चळवळीचा उद्गमकाळ आहे.

मराठीच्या भाषेच्या सुरुवातीच्या काळातील साहित्य हे वारकरी साहित्य चळवळीच्या अनुयायांकडून लिहिले गेले आहे. तेंव्हा साहित्याची जडण-घडण करण्यात वारकरी साहित्य चळवळीने फार मोठा हातभार लावलेला आहे. त्यातूनच मराठी साहित्याचे भरण-पोषण झालेले आहे. तसेच वारकरी साहित्य चळवळीत बहुजन समाजातील अनेक स्त्री-पुरुष संत म्हणून नावारुपाला आले आहेत. गोरा कुंभार, सावता माळी, चोखा मेळा, नरहरी सोनार, सेना न्हावी, परिसा भागवत, दासी जनाबाई, चोखामेळयाची बायको सोयराबाई, वेश्या असलेली संत कान्होपात्रा, कर्ममेळा अशी संताची एक व्यापक परंपरा निर्माण झालेली आहे. या सर्वच

संतांच्या वाङ्मयातून अभंगवाणीतून भक्तिरसाचे पाट पाझरतात. या सर्वच संतांच्या वाणीने नितिमत्तेचे नंदादीप पाजळले आहेत. या सर्वच संतांच्या विशाल वाङ्मय सरीतेने वारकरी साहित्य चळवळीच्या वृक्षाचे भरण पोषण करून तो फळाफुलांनी समृध्द केला आहे. याच वृक्षाला संत बहिणाबाई इमारतीची उपमा देतात.

"संतकृपा जाली। ईमारत फळा आली।
ज्ञानदेवे रचिला पाया। उभारिले देवालया ।।
नामा तयाचा किंकर । तेणे रचिले ते आवार ।।
जनार्दन एकनाथ । खांब दिधला भागवत ।।
तुका झालासे कळस । भजन करा सावकाश ।।"४

संत बहिणाबाईनी आपल्या या अभंगातून वारकरी साहित्य चळवळीचा परामर्श नेमकेपणने घेतला आहे. तो महत्वपूर्ण आहे. वारकरी साहित्य चळवळीची पायाभरणी कशी झाली याची मीमांसा करणारा संत बहिणाबाईचा हा अभंग आहे. वारकरी साहित्य चळवळीतील संतांना संत बहिणाबाईंनी इमारतीची जी उपमा दिली आहे ती उपमा योग्य आहे. कारण वारकरी साहित्य चळवळीमुळेच महाराष्ट्रात अठरापगड जातीधर्मामध्ये अनेक संत निर्माण झाले. त्यातून एक प्रकारची आध्यात्मिक लोकशाहीच त्या काळात निर्माण झाली आणि पुढे अनेक जातीच्या संतांनी अभंग रचना केली. जनसामांन्यांच्या भाषेत प्रभावीपणे या संतांनी आपल्या अभंगातून धर्मतत्व मांडले त्यामुळेच धर्माला लोकाभिमुख स्वरूप प्राप्त झाले.

थोडक्यात एकूणच मराठी साहित्य विश्वाला समृध्द करण्याचे काम वारकरी साहित्य चळवळीने केले, मराठी भाषेचा कैवार घेऊन प्राचीन परंपरेशी एकरूप होऊन संस्कृत भाषे- तील धर्माचे तत्वज्ञान मराठी भाषेत आणले. आपल्या अभंगवाणीने संस्कृत भाषेतील तत्त्वज्ञान सुबोध व रसाळ करून सर्वसामान्यांना सांगितले. धर्माला लोकाभिमुख स्वरूप प्राप्त करून दिले. सर्वसामान्य लोकांच्या अंत:करणात धर्माभिमानाची ज्योत प्रज्वलीत करून समाजाला मानवतावादी अध्यात्मिक बैठक मिळवून दिली. तत्कालीन समाजाच्या रुढ भाषेत म्हणजेच लोकांच्या बोलीभाषेत धर्मग्रंथाची रचना करून मराठी भाषेला धर्ममाषेचे स्वरूप प्राप्त करून दिले. भागवत् धर्माची उभारणी करून स्त्री-शूद्रादिकांच्या धर्मभावनेला अध्यात्म विचाराची जोड दिली. वारकरी संतांनी सामाजिक व्यवहारांपुरते चार्तुवर्ण्य व्यवस्था मान्य केली, परंतु धर्माच्या क्षेत्रात समानतेचे तत्व अंगिकारले, प्रचलित काळातील वर्णव्यवस्था त्यांनी मान्य केली. म्हणजेच जातीभेद पाळले पण जातीद्वेष मात्र टाळले, म्हणजेच वारकरी चळवळीने सामाजिक समन्वयवादचे सूत्र स्वीकारले आहे. समतेच्या व बंधुभावाच्या तत्त्वांचा पाठपुरावा करून सामाजिक विषमतेची धार वारकरी चळवळीने काही प्रमाणात का होईना कमी केली आहे. व्यापक तत्त्वज्ञान, उत्कट भक्तिभाव, स्फूर्तीदायक साहित्य व लोकाभिमुख वृत्ती यांच्या जोरावर समाजातील सर्व स्तरांना सारखेच भारून टाकले आहे. शिवकाळातील राजकीय आंदोलनाची वैचारिक पार्श्वभूमी वारकरी साहित्य चळवळीने निर्माण केली आहे. स्त्री शुद्रांबरोबर अस्पृश्यांनाही वारकरी संप्रदायाचे द्वार वारकरी साहित्य चळवळीने खुले केले आहे. महाराष्ट्रातील बहुजन समाजासाठी प्रथमच मराठीत ग्रंथलेखन करुन शूद्रातिशूद्रांच्या मुक भावनांना वाचा फोडली. संकुचित सांप्रदायिकता बाळगली नाही. प्रतिकाचा दुराग्रह धरला नाही, दैवतावर रणे माजवली नाहीत, तर परमेश्वर सर्वव्यापी आहे असे मानून विठ्ठल भक्तीचा महिमा वर्णिला. राम, कृष्ण, दत्त, शिव इ. देवतांच्या भक्तांना आपल्यात सामावून घेतले. विष्णु व शिव यांच्या ऐक्यावर भर दिला. जन सामान्यातून धर्मप्रवक्ते तयार

केले. लोकांत जी श्रध्दा होती त्या श्रध्देला डोळसपणा आणला, पुस्तकी पांडित्याला व पढ़ीक पोपटपंचीला किंमत न देता ज्ञानाला महत्व दिले. त्यामुळेच महाराष्ट्रातील सर्वसामान्य लोकांत उच्चतर जीवनाची आकांक्षा निर्माण झाली. म्हणून महाराष्ट्राच्या सामाजिक, सांस्कृतिक परिवर्तनात वारकरी साहित्य चळवळीचे मोठे योगदान आहे.

वारकरी साहित्य चळवळीने महाराष्ट्रातील जनतेच्या हृदय मंदिरात आज जिव्हाळ्याचे स्थान प्राप्त केले आहे. सद्धर्म आणि सदाचार याची लोकांना शिकवण दिली आहे. श्रेष्ठ अशा जीवनमूल्यांचे रक्षण करीत समाजात परिवर्तन घडवून आणले आहे. म्हणून वारकरी साहित्य चळवळ कुटुंब धर्म चळवळ अहे. समाज धर्म चळवळ आहे. चित्त शुध्द करणारा निखळ धर्म आहे. यादवकाळात धर्मसंस्काराने बधीर झालेल्या दिशाहीन समाजाला दिशा देणारी ती परिवर्तनाची चळवळ आहे. या साहित्य चळवळीच्या संत ज्ञानदेव, नामदेव, एकनाथ व तुकाराम या चार संत श्रेष्ठांनी वारकरी साहित्य चळवळीच्या मंदिराची जी उभारणी केली तीच मुळात विश्वकल्याणाचे सूत्र केंद्रस्थानी ठेवून केली आहे. त्यामुळे आजही या साहित्य चळवळीचे अनुयायी दिवसेंदिवस वाढत आहेत. तसेच या साहित्य चळवळीचा प्रभाव मराठी जनमाणसांवर आजही कायम आहे. म्हणून "महाराष्ट्राच्या सांस्कृतिक भाषिक आणि वाङ्मयीन इतिहासात भागवत धर्माच्या या स्थापनेला फार महत्त्वाचे स्थान आहे. किंबहुना या इतिहासाचे ते सर्वस्व आहे."५ कारण सर्व जाती धर्माचे पंथाचे स्त्री-पुरुष, वृध्द-तरुण, गरीब-श्रीमंत, सुशिक्षित-अशिक्षित असे कितीतरी लोक वारकरी साहित्य चळवळीला जाऊन मिळाले आहेत. समाजात शांतता नांदावी, स्वास्थ्य रहावे, एकोपा वाढावा आणि किर्तणाच्या प्रवचनाच्या आणि साहित्य चळवळीच्या माध्यमातून ते प्रयत्न करीत आहेत. आज महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात इतकेच नाहीतर महाराष्ट्राच्या बाहेरही वारकरी साहित्य चळवळीचे अनुयायी दिसून येतात. तेंव्हा वारकरी साहित्य चळवळीचे समाज परिवर्तनात किती मोठे योगदान आहे हे आपल्या लक्षात येते.

संदर्भ टिपा :

१. सरिता हरिदास जांभुळे, चोखोबाची कविता, सुगावा प्रकाशन, पुणे, प्र.आ. २०० पृ.६९.
२. रा.तु. भगत (संपा.), संत साहित्य आणि समाज प्रबोधन, दिलिपराज प्रकाशन प्रा. लि.पुणे. प्र.आ.२००५, पृ.५७.
३. डॉ. संतोष हंकारे, वारकरी व महानुभाव संप्रदाय एक तुलनात्मक अभ्यास, अप्रकाशीत पीएच.डी. प्रबंध मार्च-२०१२, पृ.३८३.
४. शालिनी जावडेकर (संपा.), संत बहिणाबाई अभंग गाथा, कॉन्टिनेंटल प्रकाशन, पुणे, प्र.आ.१९७९, पृ.५४.
५. गं. बा. सरदार, संत वाङ्मयाची सामाजिक फलश्रुती, श्रीविद्या प्रकाशण, पुणे, प्र.आ.१९८२, पृ.९६